Vol 2 Issue 1 Feb 2012

ISSN No : 2230-7850

International Multidisciplinary Research Journal

# Indian Streams Research Journal

Executive Editor
Ashok Yakkaldevi

Editor-in-Chief
H.N.Jagtap

**Welcome to ISRJ**

**RNI MAHMUL/2011/38595** **ISSN No.2230-7850**

Indian Streams Research Journal is a multidisciplinary research journal, published monthly in English, Hindi & Marathi Language. All research papers submitted to the journal will be double - blind peer reviewed referred by members of the editorial board.Readers will include investigator in universities, research institutes government and industry with research interest in the general subjects.

**Regional Editor**

Dr. T. Manichander

Mr. Dikonda Govardhan Krushanahari
Professor and Researcher ,
Rayat shikshan sanstha's, Rajarshi Chhatrapati Shahu College, Kolhapur.

## *International Advisory Board*

Kamani Perera
Regional Center For Strategic Studies, Sri Lanka

Janaki Sinnasamy
Librarian, University of Malaya

Romona Mihaila
Spiru Haret University, Romania

Delia Serbescu
Spiru Haret University, Bucharest, Romania

Anurag Misra
DBS College, Kanpur

Titus PopPhD, Partium Christian University, Oradea,Romania

Mohammad Hailat
Dept. of Mathematical Sciences, University of South Carolina Aiken

Abdullah Sabbagh
Engineering Studies, Sydney

Ecaterina Patrascu
Spiru Haret University, Bucharest

Loredana Bosca
Spiru Haret University, Romania

Fabricio Moraes de Almeida
Federal University of Rondonia, Brazil

George - Calin SERITAN
Faculty of Philosophy and Socio-Political Sciences Al. I. Cuza University, Iasi

Hasan Baktir
English Language and Literature Department, Kayseri

Ghayoor Abbas Chotana
Dept of Chemistry, Lahore University of Management Sciences[PK]

Anna Maria Constantinovici
AL. I. Cuza University, Romania

Ilie Pintea,
Spiru Haret University, Romania

Xiaohua Yang
PhD, USA

......More

## *Editorial Board*

Pratap Vyamktrao Naikwade
ASP College Devrukh,Ratnagiri,MS India

R. R. Patil
Head Geology Department Solapur University,Solapur

Rama Bhosale
Prin. and Jt. Director Higher Education, Panvel

Salve R. N.
Department of Sociology, Shivaji University,Kolhapur

Govind P. Shinde
Bharati Vidyapeeth School of Distance Education Center, Navi Mumbai

Chakane Sanjay Dnyaneshwar
Arts, Science & Commerce College, Indapur, Pune

Awadhesh Kumar Shirotriya
Secretary,Play India Play,Meerut(U.P.)

Iresh Swami
Ex - VC. Solapur University, Solapur

N.S. Dhaygude
Ex. Prin. Dayanand College, Solapur

Narendra Kadu
Jt. Director Higher Education, Pune

K. M. Bhandarkar
Praful Patel College of Education, Gondia

Sonal Singh
Vikram University, Ujjain

G. P. Patankar
S. D. M. Degree College, Honavar, Karnataka

Maj. S. Bakhtiar Choudhary
Director,Hyderabad AP India.

S.Parvathi Devi
Ph.D.-University of Allahabad

Sonal Singh,
Vikram University, Ujjain

Rajendra Shendge
Director, B.C.U.D. Solapur University, Solapur

R. R. Yalikar
Director Managment Institute, Solapur

Umesh Rajderkar
Head Humanities & Social Science YCMOU,Nashik

S. R. Pandya
Head Education Dept. Mumbai University, Mumbai

Alka Darshan Shrivastava
Shaskiya Snatkottar Mahavidyalaya, Dhar

Rahul Shriram Sudke
Devi Ahilya Vishwavidyalaya, Indore

S.KANNAN
Annamalai University,TN

Satish Kumar Kalhotra
Maulana Azad National Urdu University

**Address:-Ashok Yakkaldevi 258/34, Raviwar Peth, Solapur - 413 005 Maharashtra, India**
**Cell : 9595 359 435, Ph No: 02172372010 Email: ayisrj@yahoo.in Website: www.isrj.org**

**Research Papers**

# ताम्रपट (1999) – रंगनाथ पठारे

**प्रा. गणपत हराळे**

साहाय्यक प्राध्यापक व मराठी विभागप्रमुख,
गणपतराव आरवाडे वाणिज्य महाविद्यालय, सांगली.

***सारांश –***

'ताम्रपट' ही रंगनाथ पठारे यांची सन 1994 साली प्रसिद्ध झालेली कादंबरी आहे. रंगनाथ पठारे हे सन 1980 च्या दशकात उदयाला आलेले एक महत्त्वाचे कादंबरीकर आणि कथाकार आहेत. त्यांनी 'दिवे गेलेले दिवस', 'रथ', 'चक्रव्यूह', 'हारण' 'टोकदार सावलीचे वर्तमान', 'ताम्रपट' आणि 'दुःखाचे श्वापद' या बहुचर्चित कादंब–या लिहिलेल्या आहेत. समकालीन वास्तववादी आणि आशय व शैलीचा नवीन आविष्कार करणारा लेखक म्हणून रंगनाथ पठारे हे मराठी साहित्यामध्ये सर्वत्र प्रसिद्ध आहेत. त्यांच्या 'ताम्रपट' या बहुचर्चित आणि बृहत् कादंबरीला सन 1999 सालचा साहित्य अकादमीचा पुरस्कार लाभलेला आहे. स्वातंत्र्योत्तर काळातील राजकीय जीवनाचे तपशीलवार चित्रण करणारी ही पहिली कादंबरी आहे. 'ताम्रपट' मध्ये खोलवरच्या स्तरावर अपेक्षित असणा–या मूल्य–हासाचे विविधांगी आणि प्रत्ययकारकरीत्या दर्शन घडविण्याची इच्छा असणारी पहिली कादंबरी मानावयास हारकत नाही.

***ताम्रपट चे आशयसूत्र आणि वैशिष्ट्ये –***

'ताम्रपट' ही इ.स. 1942 ते इ.स. 1979 पर्यंतच्या महाराष्टातील राजकीय व सामाजिक घडामोडींचा विस्तृत पट भक्कम विस्ताराने आणि समर्थपणे उलघडून दाखविणारी राजकीय कादंबरी आहे. सत्तास्पर्धा, सहकारी संस्था, शिक्षण संस्था, दलितांचे आणि सामान्यांचे प्रश्न, जातीयता, सरळ आणि तिरप्या माणासांची मानसिक आंदोलने अशा अनेक अंगानी 'ताम्रपट' ही कादंबरी नैतिक आणि अनैतिकतेच्या अनेक धृवांना समर्थपणे स्पर्श करते. 'ताम्रपट' मध्ये स्वातंत्र्यप्राप्तीच्या क्षणाचे रोमहर्षक दर्शनाबरोबरच स्वातंत्र्योत्तर काळातील महाराष्ट्राच्या सांस्कृतिक जीवनाचा आलेखही चित्रित केलेला आहे. 'ताम्रपट' ही कादंबरी 1942, 1957, 1962, 1967 आणि 1979 या पाच कालखंडात विभागलेली आहे. त्यात 'चलेजाव चळवळ,' 'संयुक्त महाराष्ट्र आंदोलन,' 'पंचायती राज,' 'आणीबाणी आणि जनता पक्षांचे सरकार' या महत्त्वाच्या घटनांचा उहापोह केलेला आहे. 'ताम्रपट' मध्ये इ. स. 1842 च्या स्वातंत्र्य लढ्यापासून इ. स. 1979 पर्यंतचा म्हणजे साधारणपणे चाळीस वर्षाचा कालखंड या कादंबरीत आलेला आहे. या चाळीस वर्षातील महाराष्ट्राच्या राजकीय, सामाजिक आणि शैक्षणिक अशा बहुअंगानी विस्तृत जीवनाचा वेध तीन मुख्य व्यक्ती व त्यांच्यासह असंख्य व्यक्तिचित्रणांच्या आणि घटनांच्या अनुरोधाने 'ताम्रपट' मध्ये रंगनाथ पठारे यांनी घेतलेला आहे.

दर पाच वर्षांनी होणाऱ्या निवडणुका, वेगवेगळ्या पक्षांच्या, वेगवेगळ्या आणि बदलत्या भूमिका, महाराष्ट्रातील राजकारणात पद्धतशीरपणे घुसवलेली जातीय दृष्टी, निवडणुक–प्रचारात शिरलेल्या अपप्रवृत्ती वाढू लागलेली धर्मांधता, दहशतवाद या साऱ्यांचे चित्र 'ताम्रपट' मध्ये पहावयास मिळते. इ.स. 1942 च्या इंग्रजाविरुद्धच्या देशभरातील उठावापासून 'ताम्रपट' चा प्रारंभ होतो. नाना सिरुर हे 'ताम्रपट' च्या कथानकाचे मुख्य केंद्र आहे. महात्मा गांधीजींच्या नेतृत्वाखाली सर्व भारतातील सामान्य जनता राष्ट्रीयत्वाच्या मंत्राने भारावून गेलेली होती. तुकाराम भोईटे, गुलबा नायक, पांडुरंग तिकोने, गोविंदभाई पानसरे, राधाकिसन, आवडाबाई अशा काही क्रांतीकारकांच्या स्थानिक पातळीवरील उठावापासून कादंबरीस प्रारंभ झालेला आहे. इ. स. 1942 च्या चळवळीने समग्र लोकसमुह मानस स्वातंत्र्याकांक्षेने जवळ आलेले होते. नाना सिरुर आपल्या सहकार्यांना म्हणतात – ''आपण आता कोणाच्याही आदेशाची वाट बघायची नाही. या लढ्याात प्रत्येक सैनिकांने आपल्या विवेकबुद्धीचा वापर करून योग्य तो निर्णय घ्यायचा. परिस्थिती असेल त्यानुरूप सुतपणाचा वाटेल असा रस्ता निवडायचा. आपलं ध्येय एकच –स्वातंत्र्य, पूर्ण स्वातंत्र्य!'' या चळवळीतून स्वातंत्र्याचा, स्वयंनिर्णयाचा निर्धार लोकसमूहमानसाने घेल्याचे चित्र आपल्या निदर्शनास आल्यावाचून राहत नाही. या स्वातंत्र्यलढ्यात विविध सामाजिक स्तरांतील लोक उतरल्याचे प्रातिनिधिक चित्रण प्रारंभीच्या भागात आलेले आहे. पांडुरंग तिकोनेच्या आईच्या दृष्टीने कोणते तरी गोरे लोक म्हणतेत, ते बाहेरून येऊन इथे राज्य करीत होते, त्यांना इथून घालवून देण्यासाठी काही छातीखोर लोक लढत होते, त्यांत तिचा पांडुरंग होता. तिला त्याचा अभिमान वाटू लागला होता. (पृ.142) हे निरक्षर म्हाताऱ्या स्त्रीचे 42 च्या स्वातंत्र्य चळवळीबद्दलचे आकलन आहे. नाना सिरूर या पात्राच्या कृती–उक्ती–निष्ठा हे लेखकाचे राजकीय मूल्यविधान आहे. 1942 च्या चळवळीच्या काळात नानांची राजकीय आस्था विकसित झालेली आहे. सत्तेच्या राजकारणापेक्षा समाजकल्याणाचे, जनसामान्यांच्या

अभ्युदयाचे, दुर्बलांना अधिक बळ देण्याचे राजकारण नानांनी केलेले आहे. विशिष्ट मूल्यव्यवस्थांशी एकनिष्ठ राहण्याचे राजकारण–समाजकारण नानांनी आयुष्यभर केलेले आहे. सत्य, अहिंसा , करुणा आणि सत्याग्रह ही चतु:सूत्री नानांनी आयुष्यभर महत्त्वाची मानलेली आहेत.

नाना शिरूर यांच्याप्रमाणेच या कादंबरीत स्वातंत्र्योत्तर काळात वेगळ्या वाटांनी गेलेल्या तुकाराम भोईटे आणि बापूसाहेब देशमुख यांच्या व्यक्तित्त्वाची काही मूलभूत वैशिष्ट्येही सांगितलेली आहेत. कोसळत्या काळात मानवी मूल्यांचे निरांजन सतत तेवत ठेवणाऱ्या माणसांचे प्रातिनिधिक उदाहरण म्हणजे नाना सिरूर होय. खजिना लुटणं, युद्धासाठी दारुगोळा नेणाऱ्या रेल्वेचा पूल उडवून अपघात घडविणे, स्वतंत्र रेडिओ केंद्र निर्माण करणे अशा अनेक घटनांचे चित्रण यात आलेले आहे. भूमिगत तरुणांना आधार देणाऱ्या सामान्य भारतीय जनतेच्या आणि त्यांना पकडणाऱ्या पोलिसांच्या संघर्षाचे हृदयद्रावक चित्रण 'ताम्रपट' मध्ये पहावयास मिळते. दादासाहेब भोईटे आणि बापुसाहेब देशमुख हे जनसामान्यांच्या हितासाठी साखर कारखान्याच्या उभारणीतून मोठे सत्ताकेंद्र झालेले आहेत. बापुसाहेब देशमुख तर सर्वस्वी आत्मकेंद्री आहेत. 'ताम्रपट' मध्ये असलेल्या यशवंतराव चव्हाण, इंदिरा गांधी, शरद पवार, संजय गांधी, साने गुरुजी, एस. एम. जोशी, अच्युतराव पटवर्धन इत्यादीं व्यक्तिरेखांमुळे कादंबरीच्या आशयात मोलाची भर घातलेली आहे.

इ. स. 1957 या 'ताम्रपट' च्या दुस–या भागामध्ये भारतीय राजकारणाला मिळालेल्या अनैतिक दिशांचे आणि दशेचे वर्णन केलेले आहे. या भागात संयुक्त महाराष्ट्र चळवळ, विधान सभेची निवडणुक यशवंतराव चव्हाणांची मजबुत होत जाणारी राजकारणावरची पकड, सहकार चळवळींचे लोन तसेच नानासाहेब सिरूर सारख्या निःस्पृह माणसाला निवडणुकीपासून परावृत्त करण्याचे कुटील कारस्थान इत्यादी बाबींचा ऊहापोह करण्यात आलेला आहे. स्वातंत्र्योत्तर काळात मूल्याधिनिष्ठित राजकारण हळूहळू मागे पडू लागले. आणि त्याजागी व्यक्तिकेंद्रित आणि महत्त्वाकांक्षेनी फुलवलेल्या ढोंगी राजकारणाला महत्त्व येऊ लागले. नानासाहेब सिरूर आणि एस.एम.जोशी यांच्यासारख्या तत्त्वनिष्ठ आणि सत्त्वशिल माणसालाही मनाविरुद्ध तडजोडी कराव्या लागतात. कम्युनिष्टांच्या संधीसाधु राजकारणाची काहीशी वाटचाल या कादंबरीत व्यक्त झालेली आहे. नैतिकतेची तमा न बाळगणारा आणि भरगच्च पैसा जमवून निवडणुक जिंकू शकणारा हुशार वकील बापूसाहेब देशमुख काँग्रेसकडून निवडणुकीसाठी पसंत केला जातो. स्वातंत्र्यपूर्व काळातील स्वातंत्र्याकांक्षा व स्वराज्य भक्ती यांना ओहोटी लागणारा काळ येथे चित्रित केलेला आहे. 1957 च्या या भागात तुकाराम भोईटे हे प्रारंभी जरी मतपेटीच्या राजकारणापासून बाजूला राहिलेले असले तरी नंतर सहकारी साखर कारखाना आणि पुढे खासदारकी या वळणाने पुढे–पुढेच जात राहतात. नानासाहेब सिरुर यांचे प्रत्यक्ष जनसमाजातील कार्य आणि बापुसाहेब देशमुख यांचे कार्य यातील अंतर्विरोध एकूण बदललेल्या राजकीय स्वरूपावर विदारक प्रकाश टाकतात. विधानसभा आणि लोकसभा तिकिट मिळविण्यासाठी चाललेल्या धडपडींचाही मोठा रोचक उपयोग करून घेतलेला आहे. यशवंतराव चव्हाण यांचे लेखकाने अतिशय जिव्हाळ्याने चित्र रेखाटलेले आहे. संयुक्त महाराष्ट्रासाठी सर्वच विरोधी पक्ष मोठी चळवळ उभी करतात. परंतु या विरोधकांच्याच व्यापक चळवळींचा उपयोग करून संयुक्त महाराष्ट्राचा मंगल कलश काँग्रेसकडून मिळविण्यात यशवंतराव चव्हाण मुत्सद्दीपणे यशस्वी होतात.

यशवंतराव चव्हाण यांच्या 'सुसंस्कृत राजकारणी' या प्रतिमेचाच विस्तार 'ताम्रपट' करण्यात आलेला आहे. काँग्रेसच्या राजकारणात समन्वयाचे, संघटन करण्याचे आणि सांधण्याचे तंत्र यशवंतरावांनी उपयोजिले. यशवंतरावांनी जिंकलेल्या निवडणुकीच्या संदर्भातील निवेदकाचे आकलन – भाष्य मौलिक असे आहे. यशवंतरावांनी महाराष्ट्रात एक नवे पर्व सुरु केले होते. ही गोष्ट काही अचानकपणे किंवा एकाएकी झालेली नव्हती. अतिशय हुशारीने आणि मुत्सद्देगिरीने त्यांनी नवी माणसे उभी केलेली होती. यशवंतरावांच्या राजकीय व सांस्कृतिक कार्याची शिवाजी महाराजांच्या मुत्सद्देगिरीशी येथे सलग्न केलेले आहे.

लोकशाहीत प्रत्यक्षात निवडणुकीच्या वेळी मतं ही जातीच्या नावावर मिळविली जातात. म्हणूनच नानासाहेब सिरुर शेतकरी सहकारी साखर कारखान्याच्या संचालकपदाचा राजीनामा देताना लिहिलेल्या पत्रात लिहितात – ''सध्या दिसते असे की ज्याला जे मिळते आहे तो ते अधिकाधिक ओढून घेऊ पहात आहे व जो नाडला गेला आहे त्याचा आक्रोश कुणीही ऐकत नाही, अगदी आपले दयाळू सरकारही नाही. सत्तेची गती ही स्वतःला, स्वतःच्या हितसंबंधाना बळकट करण्याकडे असते, – कदाचित ते स्वाभाविकही असेल. पण ज्या न्यायोचित सत्तेची, व्यवस्थेची मांडणी आपला विचार मानतो त्यात हे असे स्वाभाविक मानले जाणार नाही.'' ('ताम्रपट', पृ. 286 ) अशा प्रकारे नानासाहेब सिरुर हे राजकारणात जसजशा अपप्रवृत्ती आणि स्वार्थलोलुपता वाढत जाते, तसतसे नाना या राजकारणापासून अधिकाधिक दुर जातात.

इ. स. 1962 च्या तिसऱ्या भागात धरणग्रस्त विस्थापितांचे प्रश्न, नानासाहेब सिरुरांचे उपोषण, शिक्षण संस्थांची भरभराट, हिंदू – मुस्लिम विवाह, नाना सिरूर आणि बापूसाहेब देशमुखांची निवडणूक, नानांचा पराभव, राजकारण संन्यास आदी बाबींचा ऊहापोह केलेला आहे. धरणग्रस्तांच्या उपोषणासाठी बसलेल्या नाना सिरुर यांना प्रामाणिक आश्वासन देऊन उपोषण सोडवण्यात यशवंतराव चव्हाण यशस्वी होतात. शंकरराव जोशी तळागाळातल्या माणसांच्या शिक्षणाच्या सोईसाठी कॉलेज काढून त्यात कमालीचे यशस्वी होतात याची सविस्तर माहिती दिलेली आहे. परदेशी स्थायिक झालेल्या नारायण सोनवणे याचाही एक रोचक इतिहास पत्ररूपाने याच भागात सांगितलेला आहे. शाळा मास्तरची नोकरी सोडून कॉन्ट्रॅक्टर झालेल्या आणि भरपूर उर्जितावस्था प्राप्त करून घेणाऱ्या पांडुरंग तिकोनेचाही वृत्तांत कथित केलेला आहे. प्राचार्य टिपणीस यांच्या कार्यतत्पर आणि बुद्धिमान व्यक्तित्त्वाचीही चांगली उभारणी लेखकांनी केलेली आहे. नानासाहेब सिरूर आणि बापूसाहेब देशमुख यांच्या सरळ लढतीमध्ये स्वातंत्र्यासाठी कणकण झिजणारा आणि स्वातंत्र्योत्तर काळात सदैव तळागाळातल्या माणसांच्या बाजूने उभे राहणारे नानासाहेब शिरूर यांचा पराभव होतो. अयशस्वी नानासाहेब शिरुर उमेदपणाने विजेत्या बापूसाहेबांचे अभिनंदन करतात. अभिनंदन बापूसाहेब !म्हणत नानासाहेब पुढे झाले आणि साऱ्या इतकेच चकित झालेल्या बापुसाहेबांशी त्यांनी हस्तांदोलन केलं........नाना काशीनाथला म्हणाले, निवडणूक संपली. ते वातावरण संपल आता बापूसाहेब आपल्या सा–यांचे प्रतिनिधी ! ('ताम्रपट', पृ. 412) ही गोष्ट एकुणच देशाच्या राजकारणाच्या स्वरूपावर आणि वाटचालीवर विदारक भाष्य करते. या संदर्भात लेखक लिहितात –''नवे मराठा युग सुरु झाले होते. त्याला मराठी राज्य म्हणणे, जबाबदारीने वागणे असे समजुतीने सुरु झाले होते. ब्राह्मणादी उच्च जातींचा वर चष्मा आदीच संपला होता. आता सरदार, दरकदार, सरंजामदार अशी मंडळीही नगण्य होऊन मध्यम मराठा वर्गाच्या प्राबल्याचे युग सुरु झाले होते.'' ('ताम्रपट', पृ.414) नानासाहेब पक्ष सदस्यात्वाचा राजीनामा देतात. त्यावेळी निस्सार मोमिन त्यांना पुढे काय करणार आहात असे विचारतो. तेंव्हा नाना साहेब सिरूर त्यांना उत्तर देतात – प्रपंच चालेल इतपत वकिली आणि उरलेल्या वेळात मनाला आवडेल असं कोणतंही काम ! ('ताम्रपट', पृ.431) अशी ही एका महान सत्त्वाची राजकारणातून ही माघार साठनंतरच्या एकूणच राजकीय परिस्थितीविषयी खूप काही सांगून जाते.

इ. स. 1968 या चौथ्या भागात, राजकारणात आलेली भ्रष्टता आणि गटबाजीचे राजकारण याचे चित्र रेखाटलेले आहे. दादासाहेबांना 'ताम्रपट' मिळाल्यानंतर आणि त्यांचा नवा बंगला

झाल्यावर लेखकाने त्याचे केलेले वर्णन पाहण्यासारखे आहे. दादासाहेब हे समारंभपूर्वक दलितांच्या जमिनी परत करतात. स्वातंत्र्यलढ्याात भाग घेणा—या दादासाहेबांना 'ताम्रपट' मिळतो. मात्र भुजाडीमामांना तो मिळालेला नसल्यामुळे ते नाराज होतात. अशा सर्व परिस्थितीमध्ये मात्र नानांची तत्त्वनिष्ठा अबाधित राहते. जयप्रकाश सिरूर या त्यांच्या मुलाच्या इंजिनिअरिंगच्या प्रवेशासाठी त्यांच्या स्वातंत्र्यसैनिक असण्याचे सर्टिफिकेट हवे असतानासुद्धा ते त्याला देण्याचे नाकारतात. आजच्या घराणेशाहीच्या आणि भाईभतिजावादाच्या राजकीय पृष्ठभुमीवर नानांचा हा कणखरपणा फारच महान वाटतो.

स्वातंत्र्यपूर्व काळातील लोकांची चळवळ या काळात गुंडगिरीचे रूप धारण करते. राजकीय स्वार्थापोटी क्षुल्लक कारणासाठी दंगली घडविल्या जातात. अशा पेटलेल्या दंगलीच्या आगीतही नाना सिरुर जीवाची पर्वा न करता घुसतात आणि एस. आर. पी. ला वाचविण्यासाठी त्याला मिठी मारतात. सुदैवाने अकबरभाईच्या मदतीमुळे दोघेही सहीसलामतपणे घरी परततात. अकबरभाई विषण्णपणे त्यांना म्हणतो, ''इन्सान को ''इन्सान पहेचानता नही, सब हैवान हो गये.'' ('ताम्रपट' पृ.545) अशा शब्दांत दंगलीवर मार्मिक भाष्य करतात. 'पद्मश्री' किताब देण्याचा शासकीय निर्णय नानासाहेब यशवंतरावानविषयी आदरभाव व्यक्त करूनही नाकारतात. ते यशवंतराव चव्हाण यांना लिहिलेल्या पत्रात म्हणतात, ''साधनशुचितेचे मुल्य मी मानतो. ती सांभाळताना साध्याकडे जाण्यास उशीर होणार असला तरीही ती असावी असा माझा आग्रह असतो. पण माझ्याभोवती उभी राहिलेली जवळपास सारीच माणसे या ना त्या प्रकारे प्रकारे तडजोडी करीत सोयीचे वेगवान रस्ते निवडू लागली आहेत. यात कुठेतरी मी स्वतःच कमी पडू लागलो आहे असे मला वाटत आहे. साऱ्या गोष्टींची बेरीज—वजाबाकी केली की, जमेच्या, शिलकीच्या बाजूस निखळ असे जे राहते ते ही संशयास्पद वाटते अशा अपेशी मनःस्थितीत तुमच्या या किताबाचे ओझे पेलणे मला कठीण होईल. हे कृपा करून समजून घ्या. तुम्ही ते घ्याल अशी मला खात्री वाटते.''('ताम्रपट', पृ. 594) अशाप्रकारे नाना अनेकदा अशा नैतिकतेच्या अत्याग्रही भूमिकेत गुरफटलेले दिसतात.

'इ. स. 1975' या भागात आणीबाणी, जनता दलाचे सरकार, पुलोदचे सरकार, सहकारी चळवळीचे घट्ट विणले जात असलेले जाळे, विशिष्ट लोकांचे जपले जाणारे हितसंबंध आदी घडामोडींचा सूक्ष्म तपशील आलेला आहे. आणीबाणी या महत्त्वाच्या घटिताकडे लेखक संमिश्र दृष्टिकोनातून पाहतात. विनोबांनी या घटिताला 'अनुशासन पर्व' असे संबोधले आहे. एकेकाळच्या स्वातंत्र्यलढ्याात भाग घेणाऱ्या स्वातंत्र्यसैनिकाची आणीबाणी लादणाऱ्या इंदिराजींच्या चरणी समर्पित भक्ती महाराष्ट्राच्या राजकीय नेतृत्वाबद्दल खुपच विदारक भाष्य करते. मॅडमना यशवंतरावांचा महाराष्ट्राच्या राजकारणातील पाय ढिला करावयाचा होता. राजकीय स्वार्थासाठी काँग्रेस पक्षातील काही लोक गुलामगिरीच्या पातळीवर वर्तन करीत असतात. या संदर्भातील लेखकीय भाष्य अतिशय समर्पक आहे. .......आता तर आणीबाणी आलीय. सारी ताकद एका ठिकाणी एकवटलीय. हंटर घेऊन उभ्या असलेल्या सर्कशीतील रिंगमास्टरसारख्या मॅडम केंद्रस्थानी आणि बाकी सारे त्यांना चळाचळा कापत शेपटी घालून वा नजरेच्या इशाऱ्यासरशी उभारून सारे खेळ आज्ञाधारकपणे करतात. ('ताम्रपट', पृ. 594) हे भाष्य मुख्यमंत्री शंकरराव चव्हाण यांच्या संदर्भात आलेले आहे. एका कॉलेजातील प्राध्यापकाच्या भयाचे म्हणजेच बद्धिजीवी वर्गाचे काहीसे प्रातिनिधिक चित्रणही याच भागात आलेले आहे. त्याचबरोबर शरदरावांच्या स्वाभिमानी उभरत्या नेतृत्वाकडे अंगुली निर्देशही लेखकाने केलेला आहे.

'इ. स. 1979' या भागात इंदिराजीविरुद्धच्या काँग्रेसशिवाय सर्व पक्षांच्या कडबोळ्याचा, जनता पक्ष्याच्या छोट्याशा राजवटीचा आणि इंदिराजींच्या समाज ताब्यात घेण्याचा काळ इत्यादींचे वर्णन आलेले आहे. राजकारणात नव्याने येऊ घातलेल्या युवा पिढींचेही सुंदर चित्रण 'ताम्रपट' मध्ये लेखकाने केलेले आहे. शैक्षणिक संस्था राजकीय संस्था, सहकारी संस्था, कुटुंबसंस्था आणि समाज व्यवस्था अशा विविध जीवन क्षेत्रातील मूल्यघसरणीतून आलेली अस्वस्थताही 'ताम्रपट' मध्ये आलेली आहे. राजकीय मूल्यसंघर्षाला करुणामुल्याने उत्तर देता येते, असा आशावाद 'ताम्रपट' मध्ये आहे.

'ताम्रपट' मध्ये रंगनाथ पठारे यांनी 1942 पासूनच्या महत्त्वाच्या टप्प्याटप्प्यावर झालेल्या सर्वांगीण स्थित्यंतराचा, बदलाचा आणि त्यातून निर्माण झालेल्या संरचनांचा समर्थ आणि सृजनशील वेध घेतलेला आहे. नानासाहेब सिरूर हे स्वातंत्र्यप्राप्तीसाठी लढणा—या एका गटाचे प्रमुख आहेत. नानासाहेब सिरुर हे या कालखंडातल्या अवमूल्यन प्रक्रियेत टिकून राहिलेले व्यक्तिमत्त्व आहे. त्याग, क्रियाशीलता, झोकून देऊन काम करणे, सार्वजनिक आणि खासगी जीवनात नैतिकता आणि मूल्यविवेक पाळणे, तत्वनिष्ठा पाळणे, हरपल्या श्रेयाचा शोध घेणे इत्यादींचे जसे यात वर्णन केलेले आहे. त्याच प्रमाणे दादासाहेब भोईटेंची जडणघडण आणि त्यातून निर्माण झालेले नेतृत्व, या नेतृत्वाच्या रूपाने त्या परिसरात चाललेले सत्तेचे राजकारण आणि त्यांना छेद देणाऱ्या सद्सदविवेकबुद्धिला जागवताच अस्वस्थ करणाऱ्या घडामोडींलाही 'ताम्रपट' मध्ये महत्त्वाचे स्थान आहे. संबंध महाराष्ट्रातील या कालखंडाचे प्रातिनिधिक चित्रण 'ताम्रपट' मध्ये पहावयास मिळते. रंगनाथ पठारेंनी 'ताम्रपट' मध्ये उपहास, उपरोध आणि अन्य तत्सम शैलीप्रकारांचा कुशलपणे वापर केलेला आहे. त्यांनी दिलेले 'ताम्रपट' हे शीर्षक ही खूपच समर्पक आणि यथार्थ आहे. मात्र 'ताम्रपट' चा कालपट आणि आशयाचा व्याप पाहता कादंबरीत काव्यात्मक चिंतन कमी आहे.

'ताम्रपट' ही रंगनाथ पठारेंची समकालीन मराठी कादंबरीतील एक महत्त्वाची कलाकृती आहे. 'ताम्रपट' हा त्यांचा एक महत्वकांक्षी प्रयोग आहे. रंगनाथ पठारेंची 'ताम्रपट' ही कादंबरी विसाव्या शतकाच्या उत्तरार्धातील महाराष्ट्राच्या सांस्कृतिक जीवनाचा एक व्यापक पट आपल्यापुढे कलात्मकतेने उलगडते. 'ताम्रपट' मध्ये मराठ्यांच्या एकूण स्थितीगतीचे अत्यंत सूक्ष्मपातळीवर दर्शन घडविण्यात रंगनाथ पठारे कमालीचे यशस्वी झालेले आहेत. रंगनाथ पठारे यांची 'ताम्रपट' ही मराठीतील अनेक दृष्टीने लक्षणीय ठरेल अशी कादंबरी आहे. तसेच अखिल भारतीय स्तरावरही 'ताम्रपट' ने एक वेगळाच ठसा उमटविलेला आहे.

**संदर्भग्रंथः**

1. पठारे रंगनाथ, ताम्रपट, मॅजेस्टिक प्रकाशन, मुबंई – 04, पहिली आवृत्ती – 09 ऑगस्ट, 1994

# Publish Research Article
# International Level Multidisciplinary Research Journal For All Subjects

Dear Sir/Mam,

We invite unpublished Research Paper,Summary of Research Project,Theses,Books and Book Review for publication,you will be pleased to know that our journals are

## Associated and Indexed,India

- International Scientific Journal Consortium
- OPEN J-GATE

## Associated and Indexed,USA

- Google Scholar
- EBSCO
- DOAJ
- Index Copernicus
- Publication Index
- Academic Journal Database
- Contemporary Research Index
- Academic Paper Databse
- Digital Journals Database
- Current Index to Scholarly Journals
- Elite Scientific Journal Archive
- Directory Of Academic Resources
- Scholar Journal Index
- Recent Science Index
- Scientific Resources Database
- Directory Of Research Journal Indexing



Indian Streams Research Journal
258/34 Raviwar Peth Solapur-413005,Maharashtra
Contact-9595359435
E-Mail-ayisrj@yahoo.in/ayisrj2011@gmail.com
Website : www.isrj.org